करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
साप्ताहिक
कमलाभवानी
# संदेश
वर्ष 34 वे
www.saptahiksandesh.com
संस्थापक संपादक
डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०


Shweta
Gift & Toys
श्वेता गिफ्ट ॲन्ड टाईज
लहान मुला-मुलींसाठी थार(जीप) 4 X 4 येथे उपलब्ध !
श्रीराम मंदिर शेजारी, वेताळपेठ, करमाळा. (9822058106 )

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.२६ | पाने-१६ | दि.१८/०४/२०२५ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत - ४ रू.

॥ श्री ज्योतिबा प्रसन्न ॥
फ्रेंड्स
मोबाईल शॉपी
& इलेक्ट्रॉनिक्स
आमच्याकडे सर्व नामांकित कंपन्यांचे नवीन **मोबाईल** व **स्मार्ट एलईडी टिव्ही** होलसेल दरात मिळतील.
मोबाईल खरेदीवर हमखास भेटवस्तू
सर्व प्रकारचे फायनान्स उपलब्ध
डाऊन पेमेंटवर मोबाईल मिळेल.
एक्सचेंज : जुना द्या, नवीन घ्या..!
प्रोप्रा : प्रफुल प्रदीप शिंदे
पत्ता : किल्लावेस, करमाळा.(9823162510, 9326969696)


रूचकर, स्वादीष्ट, चविष्ट जेवणासाठी
न्यु यशराज फॅमिली रेस्टॉरंट
व्हेज/नॉनव्हेज
गोवा मधील बीच चा आनंद & गोवा नाईट पबचा आनंद
• भव्य पार्कींगची सोय
• विनम्र व तत्पर सेवा
• फॅमिलीसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था
कार्यालयाचा भला मोठा खर्च वाचवा, छान.. छान..
न्यु यशराज फॅमिली रेस्टॉरंटला एकवेळ याल तर पुन्हा सारखे सारखे याल..
बर्थडे व ॲनेव्हर्सी पार्टी तसेच छोटे-मोठे कार्यक्रमाची ऑर्डर स्विकारली जाईल.
करमाळा-कर्जत रोड, धर्मसंगीत मंगल कार्यालय शेजारी, करमाळा.(9326969696, 9881494650)

# शनिवारी रोजगार हमी मंत्र्यासह पालकमंत्री करमाळ्यात

## नरसिंह चिवटे यांचा नागरी सत्कार

करमाळा : करमाळा येथील स्वातंत्र्य सैनिक वारसदार उच्चधिकारी संघटनेचे सचिव तसेच महाराष्ट्र सीड्स पेस्टीसाईड फर्टीलायझर्सचे सचिव व ज्येष्ठ पत्रकार नरसिंह(आप्पा) मनोहरपंत चिवटे यांच्या ८५ व्या वाढदिवसानिमित्त शनिवारी १९ एप्रिलला करमाळा येथे रोजगार हमी मंत्री भरतशेठ गोगावले, पालकमंत्री जयकुमार गोरे, प्रहार संघटनेचे अध्यक्ष व माजी आमदार बच्चु कडू, मोहोळचे आमदार राजाभाऊ खरे यांच्यासह साहित्यिक विश्वास पाटील सह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यावेळी तालुक्यातील जास्तीत जास्त नागरीकांनी उपस्थित रहावे; असे आवाहन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे तसेच उपमुख्यमंत्री वैद्यकिय मदत कक्ष कक्षप्रमुख मंगेश चिवटे यांनी केले.





हा कार्यक्रम शनिवारी सायंकाळी चार वाजता अमरनाथ टॉवर, श्रीदेवीचामाळ रोड येथे होणार आहे. यावेळी माजी आमदार शहाजीबापू पाटील, मनोहर चंद्रिकापुरे, सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रबुध्द झपके, आग्रा शिवजयंती उत्सव जनक विनोद पाटील (संभाजीनगर), शिवचरित्रकार यशवंतराव गोसावी (नाशिक), राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभिजीत पाटील (संभाजीनगर), उद्योजक बाजीराव चव्हाण (मुंबई), लिंगायत संघर्ष समितीचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे, महाराष्ट्र वीरशैव सभा अध्यक्ष सुनीलशेठ रूकारी, उद्योजक सागरशेठ रूकारी (पुणे) तसेच आमदार नारायण पाटील, माजी आमदार संजयमामा शिंदे, जयवंतराव जगताप, विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, मकाईचे माजी चेअरमन दिग्विजय बागल, दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.रामदास झोळ, यशकल्याणीचे गणेश करे-पाटील, तहसीलदार शिल्पाताई ठोकडे, पोलीस निरीक्षक विनोद घुगे,मुख्याधिकारी सचिन तपसे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

नरसिंह आप्पा चिवटे यांच्या वाढदिवसानिमित्त १९ एप्रिलला सकाळी दहा ते पाच या वेळेत मोफत आरोग्य शिबीर, मोफत चष्मा वाटप, औषधे वाटप केली जाणार आहेत. (पान ७)

संस्थापक



आधारस्तंभ

श्री.ज्ञानदेव रावसाहेब थोरात
(दत्त दिगंबर कन्स्ट्रक्शन प्रा.लि; कर्जत)
थेरवडी(ता.कर्जत) येथील गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर व दत्त दिगंबर कन्स्ट्रक्शन प्रा.लि; चे संस्थापक
मा.श्री.दादासाहेब रावसाहेब थोरात
यांची जर्मनी येथे आयोजित केलेल्या जागतिक स्तरावरील कन्स्ट्रक्शन क्षेत्रातील नवनवीन मशिनरीचे प्रदर्शनासाठी अहिल्यानगर (अ.नगर) जिल्ह्यातून एकमेव निवड झाल्याबद्दल तसेच दि.५ ते १४ एप्रिल या कालावधीत त्यांनी यशस्वीरित्या जर्मनी दौरा पार पाडल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !
श्री.दादासाहेब रावसाहेब थोरात
(दत्त दिगंबर कन्स्ट्रक्शन प्रा.लि; कर्जत)
शुभेच्छुक
• हिरडे परिवार, पोथरे, ता.करमाळा • पोकळे परिवार, थेरवडी, ता.कर्जत • D.D.C. Group व सर्व कर्मचारी स्टाफ

जीवन जगण्याची कला शिकलात का ..? नसेलतर शिका व आनंदी रहा...!

संपादकीय.............................................!

# जगा रे..., का मरताय ?

गेल्या आठवड्यात पती पत्नीचे किरकोळ कारणावरून भांडण झाले. पतीला राग आला आणि त्यांने घराजवळून जात असलेल्या वीज वाहक तारेला धरले आणि दोन मिनीटात होत्याचे नव्हते झाले. या घटनेवरून मला २१ सप्टेंबर २०२१ रोजी करमाळा शहरातील व्यवसायिकांने केलेल्या आत्महत्येची आठवण आली. ती आत्महत्या ऐकलेतरी अंगावर काटा उभा रहातो. त्यांनी फर्शी कट करण्याच्या कटरने चक्क स्वत:चा गळा चिरला व मृत्यूला वाट मोकळी करून दिली होती.

खरं तर आत्महत्या का करायची ? हा खरा प्रश्न आहे. आपले पुर्वज म्हणतात,की ८४ लक्ष योनी फेरा झाल्यानंतर मनुष्य जन्म मिळतो. म्हणजे मनुष्य जन्म दुर्लभ आहे. संत तुकाराम महाराज म्हणतात... "यह लोकीचा हा देह।देव इच्छितीती पाहे ॥ धन्य आम्ही जन्माला आलो । आणि दास विठ्ठोबाचे झालो ॥" म्हणजे देवाला जो देह मिळत नाही, तो देह आम्हाला मिळाला आहे. पण दुदैवाने त्याचे महत्व आम्हाला कळत नाही. खरंतर प्रत्येकासमोर वेगवेगळे प्रश्न आहेत, संकटे आहेत. आणि प्रश्न-संकटे असेलतरच तो संसार, जर प्रश्न नसतील तर ते मिळमिळीत जगणं होतं. अर्थातच प्रत्येकानं कस जगायचह ? हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे.

मंगेश पाडगावकर म्हणतात.. "तुम्हीच सांगा कसं जगायच... कण्हत कण्हत की.. गाणं म्हणत.. पायात काटे रूतून बसतात हे अगदी खरं आहे आणि फुलं फूलून येतात हे काय खरं नसतं..? काट्या सरखं सलायचं की फुलासारखं फुलायचं तुम्हीच ठरवा... सांगा कसं जगायचं, कण्हत कण्हत की.. गाणं म्हणत.." या गीताकडे काहीजण जेंव्हा होकारार्थी रितीने पहातात तेंव्हा त्यांना प्रेरणा मिळते. पण काहीजण उगाचच या गीतावर चिडतात. अहो कोरानाने कंबरडं मोडले, काम गेले, धंदा बंद पडला, दुसऱ्या बाजूला निसर्ग साथ देईना, प्रशासन योग्य काम करीना, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, कुंटूबात खायचा प्रश्न, जनावरांना पाणी व चारा , शेतातला ऊस काढायचे आव्हान, शेतातली फळझाडं जगवण्याचं आव्हान, मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न, लग्नाचा प्रश्न, बँकेचे कर्ज -खाजगी देण्याकराचे कर्ज फेडण्याचा प्रश्न असे एक ना अनेक प्रश्न सर्वांच्या समोर आहेत. अशा स्थितीत गाण म्हणत जगणं कसं शक्य आहे.

पण एक गोष्ट महत्वाची आहे. संकटावर मात करण्याचा मंत्र समजला की जगण्याला वेगळीच दिशा मिळते. त्यामुळे तर विचारवंतांनी म्हटले आहे. "संकटं शाप नसतात तर ती वरदान असतात. पण हे जर सकंट येणार हे आगोदर समजलेतर, बरोबर ना..? दुष्काळतर वर्षा आड येतोच ना..! तो कधी येतो हे माहित नाही पण तो येतो हे नक्की..!" मग तो येणार आहे हे समजून त्यावर मात करण्याचे नियोजन केले पाहिजे. दुष्काळ येण्याची आपण वाट पाहत बसलो तर आल्यानंतर धावपळ करून उपयोग काय ? त्यामुळे जगणं कठीण होवून जातं. खरंतर दुष्काळ येण्यापुर्वीच त्याची तजबीज केली पाहिजे तसेच कोरोना, स्वाईनफ्ल्यु, त्सुनामी , भुकंप अशा अप्रिय घटना येत रहाणारच, त्याला पण सज्ज रहायला पाहिजे.

प्रत्येक बँकेच्या व्यवहाराचा फंड जसा असतो तसा गंगाजळी हा एक फंड असतो. कधी अडचण येईल तेंव्हा तो फंड वापरला जातो. त्याप्रमाणेच आपणही आपली गंगाजळी उभा केली पाहिजे. ज्यांनी आपली कल्पकता वापरली व मेहनत केली त्यांनी अशा संकटावर सहज मात करून जगण्याचा आनंद लुटला. कोरोनाने घराच्या बाहेर जायला बंदी होती. जे लोक वर्षानुवर्षेघराच्या बाहेर होते, त्यांना वर्क फ्रॉम होम ने घरी रहाण्याची संधी मिळाली. ते परिवारात राहून जॉब करत राहले व आनंद लुटत राहिले. अनेकजण परप्रांतीय परप्रांतात जावून काम करत होते ते आपल्या गावात घरात राहून , परिवारासोबत आनंदात राहिले. तर काहीजण रोज रोज घरात राहून वैतागले होते.

खरंतर मनुष्याचा जन्म एकदाच येतो हेच आपण विसरून जातो. एकाने सुंदर म्हटले, की ङ्गसफर की मजा लेना हो तो साथ मे सामान कम रखो.. जिंदगीकी मजा लेना हो तो दिल मे आरमान कम रखो...तजुर्बा है मेरा, मिठ्ठी की पकड मजबुत होती है.. संगमरवरपे तो पाव फिसलते है.. जिंदगीको सिरीयस नही लेने का.. क्यों की यँहासे कोई जिंदा वापीस जानेवाला नही..ङ्ग थोडक्यात जर एकदाच जन्म येणार असेलतर त्यामध्ये सतत पैशाचा विचार करून चिंतेला काय म्हणून स्थान द्यावे, कल्पकतेला का स्थान नको...? आलेली संकटे निवारण्यासाठी वेगळा विचार का नको..? आपण निसर्गात वावरत असूनही निसर्गाच्या कृतीकडे पाहात नाही. नदी जेंव्हा वाहते तेंव्हा वाटेत मोठ मोठे दगड, ओघळ, वळणे येतात पण नदी थांबते का..? ती या सर्वांना ओलांडून पुढे पुढे वाहत जाते. वाहत तर जाते पण काठावरच्यांची तहान भागवत जाते, हे विसरून चालत नाही. जीवन कसे जगावे याच्या भिन्न कल्पना असल्यातरी जीवन आनंदी असावे याबाबत एकमत असायला हरकत नाही. कष्ट तर सर्वांनाच करावे लागतात,पण कष्टाचे चीज होत नाही म्हणून अनेकजण जीवनावर रूष्ट होतात. प्रत्यक्षात कोणतेच कष्ट वाया जात नसतात. त्यातून पुरेपूर मोबदला मिळालेला असतो. फक्त आपली नजर त्याकडे नसते. आपण प्रत्येक कष्टाची मोजदाद ही पैशात करतो व तेथेच घोटाळा होतो. जेंव्हा नवीन वकील सुरवातीला व्यवसाय करत असतो तेंव्हा खूप मेहनत करूनही त्याच्या हातात खूप कमी पैसे पडतात तर वरीष्ठ वकील केवळ सही करून व युक्तीवाद करून हजारो रूपये मिळवतात व पक्षकारही त्यांना पैसे देतात. नवीन वकील नाराज झालातर तो भविष्यात वरीष्ठ वकीलाचा सन्मान कधीच मिळवू शकणार नाही. सुरवातीला कष्ट हे शिकण्यासाठी पडतातच, अनेकांना पैसे मिळतात हे दिसते पण त्यामागे त्यांची मेहनत व कल्पकता ही आपल्या लक्षात कधी येत नाही. प्रत्येक क्षेत्रात सुरवात ही कष्टाची व अपयशाची असते पण त्यातून जे ज्ञान मिळते ते आयुष्याला पुरेल इतके असते हे विसरून चालत नाही.

जीवनात नव्या विचाराचा वारसा चालवण्याची गरज आहे. जे आडीवर आडी घालून गावातच जुगार खेळत बसले तर ते काय प्रगती करणार..? सरकारला दोष देण्यात धन्यता मानत बसले त्यांचे भविष्य संपते..यातूनच स्पष्ट होते की ,, संकटं अडचण नाहीतर एक नवी संधी घेऊन येतात. जगात कोणतीही घटना वाईट किंवा चांगली असत नाही. काही घटनेत चांगुलपणा जास्त ती आपल्याला चांगली वाटते तर काही घटनेत वाईटपणा जास्त ती घटना आपणाला वाईट वाटते. आपण सकारात्मक विचारातून त्यातील चांगल्या बाबी विचारात घेतल्यातर निराशा निघून जाते. त्यामुळे वाट्याला येणाऱ्या प्रत्येक क्षणाच्या स्वागतला आपण सज्ज राहायला पाहिजे. जीवन जगत असताना आजूबाजूच्या घटनाचे ताणतणाव शरीर व मनावर पडत असतात. ते ओळखता आले पाहिजे मग शरीरावर आपण ताणतणाव घेणार नाही. प्रत्येक प्रसंगात चांगले शोधून सकारात्मक वागता आले तर जगणे खूपच सोपे होते.आपल्या जीवनात झाकून ठेवण्यासारखे काही नसलेतर चिंता राहत नाही व चिंता नसलीतर दु:ख असत नाही. जिथे दु:ख नसते तिथे माणसं उत्साहाने वागतात, शक्यतो जगताना खोटेपणाचा आव आणत नाही. जर सवांदात खरेपणा नसेलतर आयुष्य निरस व उदास होते. जीवन जगताना दोन गोष्ट नेहमी आढळतात. काहीजण फक्त स्वत:चाची काळजी घेतात तर काहीजण स्वत:ची आजीबात काळजी घेत नाहीत. या दोन्ही गोष्टी वाईट आहेत.जीवन जगण्याची कला म्हणजे व्यक्तीगत आयुष्य व सामाजीक आयुष्य यातील समतोल राखणे होय. समाजाची काळजी घेत स्वत:ची प्रगती केली पाहिजे. जगण्याचा आनंद घेण्यासाठी स्वत:कडे लक्ष दिले पाहिजे, स्वत:साठी वेळ दिला पाहिजे, आरोग्याची काळजी घेत इतरांना आनंद वाटेल असे कृत्य ठेवल्यास जगण्यावरची श्रध्दा वाढते. आपले परिवार, स्नेही, मित्र परिवार यामध्ये सुसंवाद, सामंजस्य व सच्चेपणा पाहिजे. बऱ्याचवेळा आपण जसे आहोत त्यापेक्षा वेगळे व्हावे वाटते. अर्थातच आपण ज्या क्षेत्रात आहोत तेथे उच्च स्थानावर जावे ही महत्वाकांक्षा असणे कधीही चांगले पण वेगळ्या क्षेत्राचा हव्यास आला व त्यात यश आले नाहीकी दु:ख अटळ असते. अशा साठी चांगली पुस्तके वाचनात पाहिजे, चांगले मित्र सोबत पाहिजे व त्यांच्या बरोबर सुसंवाद अवश्यक आहे. चांगले मित्र मित्राला उंच पोहचवतात तर वाईट मित्र मित्राला आत्महत्येच्या तख्तावर पोहचवतात. बऱ्याच वेळा आपण भुतकाळात रंगून जातो आणि विचार करतो , अरे माझ्या पुर्वीच्या आयुष्यात काही मजा आली नाही. माझं जगणं बोगस गेलं की काय..? तर कधी कधी भविष्यात कसे होणार..? याची चिंता वाहतो. आर्थिक समस्या कशा सोडवणार..? नको नको ते भविष्यातले प्रश्न मनात आणून चिंता करतो तेथेही जीवन जगणे अस्वस्थ होते. खरंतर आपले जगणे भूत-भविष्य-वर्तमान या ठोकळेबाजपणावर नसून सतत वाहणारा प्रवाह आहे, हे विसरून चालणार नाही.

पुन्हा एकदा सांगावसं वाटतं आपल्याला मिळालेलं आयुष्य हे एकदाच मिळालेलं आहे. पुन्हा हे आयुष्य नाही व त्याचा स्वाद पुन्हा नाही. त्यामुळे या जीवनात कसं जगायचं याचं भान प्रत्येकांनी ठेवले पाहिजेच पण जगारे, का मरता..?

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)


उपमुख्यमंत्री
खासदार
उपमुख्यमंत्री, ओएसडी
जिल्हा प्रमुख
हार्दिक
अभिष्टचिंतन
स्वातंत्र्यसैनिक वारसदार उच्चधिकारी संघटनेचे सचिव, महाराष्ट्र सीड्स पेस्टीसाईड फर्टीलायझर्स चे सचिव
व करमाळा तालुक्यातील ज्येष्ठ पत्रकार
मा.श्री.नरसिंह (आप्पा) मनोहरपंत चिवटे
यांच्या दि.१९ एप्रिल रोजी असलेल्या ८५ व्या वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
जगदंब डेव्हलपर्स, करमाळा.
प्रोप्रा : सुनील फुलारी
S & P Construction, Tembhurni
Pro.Saurabh Ashok Jagdale (B.E.Civil Engg), Govt Contractor
श्री.सुनील फुलारी
श्री.दिपक पाटणे
अध्यक्ष-केमिस्ट अँड ड्रगीस्ट असो;
करमाळा तालुका

# कै.जनाबाई खताळ वाचनालय तर्फे आंबेडकर जयंती साजरी



करमाळा(सं.प्र.): आवाटी येथील कै.जनाबाई एकनाथ खताळ सार्वजनिक वाचनालय तर्फे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त जिल्हापरिषद प्राथमिक शाळेत निबंध, वक्तृत्व व रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या. सुरुवातीला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शाळेत स्पर्धेला सुरुवात झाली. यामध्ये बहुसंख्य विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या. स्पर्धेतील प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ क्रमांक मिळवलेल्या यशस्वी स्पर्धकांचा थोर महापुरूषांचे पुस्तक देऊन वाचनालयाच्या वतीने गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन वाचनालयाचे अध्यक्ष चंद्रकांत खताळ यांनी केले.अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक मधुकर अंधारे हे होते. निबंध स्पर्धेत मोठ्यात गटात श्रावणी शिंदे – प्रथम, नंदकुमार शिंदे – द्वितीय, साक्षी चौधरी – तृतीय, श्रेया शिंदे व अंकिता चौधरी – उत्तेजनार्थ. लहान गटात अंजली शिंदे – प्रथम, अनुष्का चोपडे – द्वितीय, राजश्री हराळे व नंदनी ननवरे – तृतीय. वक्तृत्व स्पर्धेत अनुष्का चोपडे – प्रथम, श्रावणी शिंदे – द्वितीय तर रांगोळी स्पर्धेत राजश्री हराळे व अनुष्का चोपडे यांचा प्रथम तर सई चिरके व प्राजक्ता शिंदे यांचा द्वितीय व तर अंकिता चोपडे व नंदिनी शिंदे यांचा तृतीय क्रमांक आला आहे. वाचनालय तर्फे सर्वांचा सन्मान करण्यात आला. सुत्रसंचालन शबाना मुलाणी यांनी केले तर आभार खताळ यांनी मानले.

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



करमाळा(सं.प्र.): विद्या विकास मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे यांचे हस्ते करून विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील, उपप्राचार्य डॉ.अनिल साळुंखे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक यांचेसह कनिष्ठ व वरीष्ठ विभागातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.


प्रोप्रा : सुनील भिमशंकर चिवटे

**गुंडाप्पा फटाका स्टॉल**



नामवंत कंपनीचे...
- तोफा, कलर तोफा
- ६० शॉट, १२० शॉट, २४० शॉट
- कागदी शॉट
- एक हजारी माळ, दोन हजारी माळ पाच हजारी माळ इ.

फटाके होलसेल दरात मिळतील

शॉपिंग सेंटर, गाळा नं.६, सागर थिएटरच्या समोर, गायकवाड चौक, करमाळा.

संपर्क : मो.9850746608 / 9763635707



डॉ.नायकुडे यांचे **डोळ्यांचा दवाखाना**

**श्रीजय नेत्र रुग्णालय**

डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे
M.S. Netra (Ayu)
(Gold Medalist)
(नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
Reg no.1-77199-A

- मोतीबिंदू(Catract) आधुनिक मशिनद्वारे शस्त्रक्रिया
- डोळ्यांवरील पडदा, तिरळेपणा, लासूर शस्त्रक्रिया उपलब्ध
- Nd YAG लेसर सुविधा उपलब्ध

इमर्जन्सी सेवा उपलब्ध


वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते रात्री ९ (रविवार - सकाळी १० ते दु.२ पर्यंत)

**श्रीजय ऑप्टिकल** (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)

श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३

रिसेप्शनीस्ट नेमणे आहे. गरजूंनी त्वरीत संपर्क साधावा !


# कुंभेज येथील चित्रकार कन्हेरे यांच्या चित्राचे दुबईत प्रदर्शन



करमाळा(सं.प्र.): कुंभेज येथील चित्रकार निवास गोवर्धन कन्हेरे यांच्या चित्रांचे प्रदर्शन दुबई येथील आंतरराष्ट्रीय वर्ल्ड आर्ट या आर्टफेअर मध्ये होत असून देशातील मोजक्या चित्रकारांच्या कलाकृतीमधील करमाळा तालुक्यातील एका सामान्य शेतकऱ्याच्या मुलाच्या कलाकृतीचा आंतरराष्ट्रीय स्तरावर समावेश होत असल्याने कन्हेरे यांचे सर्वत्र कौतूक होत आहे. दुबई वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे १७ ते २० एप्रिल दरम्यान होणाऱ्या वर्ल्ड आर्ट दुबई आर्ट फेअर मध्ये जगभरातील कलाकार आणि आर्ट गॅलरी सहभागी होत आहे. या आर्ट फेअर मध्ये मुंबई मधील बियॉन्ड आर्ट गॅलरी सहभागी होत आहे. या गॅलरीचे मालक विभुराज कपूर यांनी या प्रदर्शनासाठी भारतातील मोजक्या चित्रकारांची निवड केली असून त्यामध्ये निवास कन्हेरे यांच्या अमूर्त चित्रांचा समावेश आहे. निवास कन्हेरे यांना लहानपणापासून चित्रकलेची आवड होती. नंतर त्यांनी चित्रकला विषयात पदविका अभ्यासक्रम पूर्ण करून चित्रकला शिक्षक म्हणून काही काळ करमाळा येथे नोकरी केली. परंतु त्यांचे मन नोकरीत रमले नाही. त्यांनी पुन्हा मुंबई येथील जे.जे.स्कुल ऑफ आर्ट येथून ललीत कला प्रकारात पदविका अभ्यासक्रम पूर्ण केला. यानंतर त्यांनी या कलेसाठी झोकून देऊन काम सुरू केले. अमूर्त चित्र (स्ट्रेक पेंटिंग) या प्रकारामध्ये त्यांनी आजपर्यंत अप्रतिम कलाकृती तयार केल्या. त्यांना आपल्या देशासह परदेशातही मोठा प्रतिसाद मिळाला. त्यांच्या चित्रासाठी हजारो रूपये मोजण्यासाठी चित्रप्रेमी तयार असतात. मुंबई येथील जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये त्यांना चित्रप्रदर्शनामध्ये सहभागी होण्याचा अनेक वेळा मान मिळाला आहे. आता देशाबाहेरील महत्वाच्या चित्र प्रदर्शनामध्ये निवास कन्हेरे यांना सहभागी होण्याची संधी मिळाली असून त्यांनी तयार केलेल्या पाच कलाकृतीचा समावेश या प्रदर्शनात होणार आहे.

# राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत २४० लाभार्थ्यांचा समावेश




करमाळा(सं.प्र.) : शासनाच्या शंभर दिवसाच्या कृती कार्यक्रमांतर्गत करमाळा तालुक्यातील प्रतिक्षेत असलेल्या १९० विधवा, निराधार व ५० अपंग कुटूंबातील पात्र लाभार्थ्यांचा राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत समावेश करण्याची कार्यवाही तहसीलदार शिल्पाताई ठोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुरवठा निरीक्षण अधिकारी एस.एम.चव्हाण, पुरवठा निरीक्षक डी.व्ही.ढोबळे व पुरवठा अव्वल कारकून अनिल ठाकर यांनी केली आहे. १२ एप्रिल रोजी पात्र विधवा, निराधार, अपंग व ई–श्रम लाभार्थी यांना भूसंपादन अधिकारी अमोलसिंह भोसले व तहसीलदार ठोकडे यांचे हस्ते ई–शिधापत्रिका वितरण करण्यात आले.


**श्रीकांत इलेक्ट्रीकल्स & एसी सर्व्हीस**
सावंतगल्ली, करमाळा.

एसी सर्व्हीस व मेंटनन्सची सर्व कामे केली जातील.

(प्रोप्रा : शिवाजी वीर) मो.9423333956, 7588482356, 7588392837



# २५० किलोमीटरवरील दोन मंदिरांना जोडणारी सायकलवरील तीर्थयात्रा

माझे मुळ गाव करमाळा तालुक्यातील विहाळ. दुष्काळग्रस्त भाग, उदरनिर्वाहाच्या साधनांची कमतरता म्हणून विहाळ या गावातील अनेक होतकरू तरूण रोजगाराच्या निमित्ताने पुणे शहरात आले. मिळेल ते काम करत उदरनिर्वाह करू लागले. बहुतेक लोक कात्रज परिसरात स्थानिक झाले. मी ही असात एक होतकरू तरूण. कात्रज परिसरात स्थायिक झालो.

आमच्या गावचे ग्रामदैवत काळभैरवनाथ हे जागृत देवस्थान. भैरवनाथाचे मंदिर दक्षिणमुखी आहे. मी लहानपणापासूनच भैरवनाथाचा निस्सीम भक्त. कात्रज परिसरात आल्यावर मला असे कळाले की, येथेही भैरवनाथाचे मंदिर आहे. माहित झाल्यावर मला फार आनंद झाला. मनाला उदासी वाटल्यास किंवा काही मानसिक ताण आल्यावर मी अधूनमधून या कात्रजच्या भैरवनाथ मंदिरात जातो. मी भैरवनाथाचा एकनिष्ठ भक्त असल्याने याही भैरवनाथाच्या मंदिरात गेल्यावर आणि दर्शन घेतल्यानंतर मला अवर्णनीय मन:शांती मिळते. शिवाय अमाच्या गावचे भैरवनाथ मंदिर दक्षिणमुखी व हे मंदिरही दक्षिणमुखी. मूर्तीही हुबेहूब समान ! त्यामुळे गावातील भैरवनाथाचे दर्शन घेतल्याचा आनंद होतो. आमच्या गावातील भैरवनाथाची पालखी वर्षातून दोन वेळा निघते. याही भैरवनाथाची पालखी दोन वेळा निघते.

हे सर्व साम्य लक्षात घेता, माझ्या मनात अशी कल्पना आली, की या दोन भैरवनाथांना जोडणारी एक तीर्थयात्रा करावी. पण ती कशी करावी ? कोणत्याही वाहनाने करावी म्हटले तर त्यात वेगळेपण असे काहीच नव्हते. अनेक लोक चारचाकी वगैरे वाहनांनी अनेक तीर्थांच्या तीर्थयात्रा करतात. यात वेगळे काय आहे? आपण काहीतरी वेगळे करावे असे मनात ठरविले. याच वेळी अचानक सुचले की, आपण सायकलने ही तीर्थयात्रा करायची. चैत्र वद्य अष्टमीला आमच्या गावाची भैरवनाथाची यात्रा असते. त्या अगोदर आठ दिवस म्हणजे हनुमान जयंती दिवशी सोनारी(ता.परांडा) या गावावरून विहाळ पर्यंत ज्योत आणली जाते. सोनारी हे परांडा तालुक्यात असून आमच्या गावच्या भैरवनाथाचे मुळ ठाण सोनारी हे आहे. म्हणून मी असे ठरविले की, कात्रजच्या भैरवनाथ मंदिरापासून सायकलने प्रवास सुरू करायचा. नंतर विहाळहून सोनारी येथे जायचे. आणि पुन्हा ज्योतीबरोबर सायकलवरच विहाळ येथे परत यायचे !

ठरले.. आणि पहाटे साडेतीन वाजता सायकलवर प्रवास सुरू केला. हे सर्व अंतर दोनशे ते



अडीचशे किलोमीटरहून जास्त आहे. एवढे अंतर, ते ही उन्हाळ्यात प्रवास करणे सोपे नव्हते. त्यासाठी अगोदरच सायकलिंगचा खूप सराव केला. दररोज कात्रज ते कात्रज घाटापर्यंत चढ असलेल्या मार्गावरून दहा किलोमीटर इतकीय सायकलिंग केली. सायकलिंगचे सर्व नियम आत्मसात केले आणि नंतर हे वेगळे पाऊल उचलले.

पहाटे साडेतीन वाजता सायकलिंगचे सर्व नियम पाळून प्रवासाला प्रारंभ केला. माझ्यासाठी हा एक अद्भुत, अविस्मरणीय अनुभव होता. सायकलवरून लोणी, उरळीकांचन, यवत, केडगाव, पाटस वगैरे गावे पार करत पुढे प्रवास करत राहिलो. माझे देहभान हरपल्यासारखे झाले होते. कसलाही थकवा नव्हता, आळस नव्हता. अन्नाची सोडा, पाण्याचीही आठवण झाली नाही. माझ्या अंगात जणू दैवी संचार झाल्यासारखे झाले होते. कात्रज(पुणे) ते भिगवण असा सुमारे शंभर किलोमीटरचा प्रवास एकदाही न थांबता केला. ही एक अविश्वसनीय बाब होती. त्यानंतर भिगवण येथे काळभैरवनाथाचे दर्शन घेतले. थोडी विश्रांती गेतली. चहापान नाष्टा केला. अर्ध्या तासानंतर पुन्हा विहाळच्या दिशेने सायकल दमटली. मी पुण्याहून सायकलवरून येत आहे, याचे अनेक गावकऱ्यांना कौतूक वाटले. त्यानंतर त्यांनी मार्गात कुंभारगाव, सावडी येथे चहापान, नाष्ट, शरबद वगैरे सेवा पुरविल्या. त्यांच्यामुळे मला पुन्हा प्रोत्साहन मिळाले. आणि सुमारे १५५ किलोमीटरचा प्रवास नऊ तासात पूर्ण केला. मुक्कामी विहाळ या माझ्या गावात आलो.

माझा प्रवास एवढ्यातच संपला नव्हता. गावातील तरूण भैरवनाथाची ज्योत आणण्यासाठी रात्री दहा वाजता निघातात. ते टेंम्पो, मोटारसायकली वगैरे वाहनांनी जातात. मला माझी यात्रा सायकलवरून पूर्व करायची होती. अर्थात सायकलवरून भैरवनाथाची तीर्थयात्रा करणे हा माझा नवस वगैरे नव्हता. पण हा एक वेगळा अनुभव होता. माझी भैरवनाथावर निष्ठा आणि भक्ती आहे. त्या निष्ठेने मी हे आनंदाने करत होतो. टेंम्पो किंवा मोटारसायकली बरोबर सायकलवरून जाणे कसे शक्य होईल त्यामुळे मी सायंकाळी पाच वाजता विहाळहून सोनारीकडे निघालो. पुढे आणखी ५५ किलोमीटरचा प्रवास ! पण मला त्याची काळजी वाटत नव्हती. अगोदरच निघून साडेनऊच्या सुमारास सोनारीला पोहोचलो. रात्री बाराच्या सुमारास ज्योत नेणारी तरऊण मंडळी सोनारीला पोहोचली. तेथे स्नान वगैरे करून, भैरवनाथाचे दर्शन घेऊन ज्योत घेऊन आम्ही पुन्हा माघारी निघालो. मी ही सायकलवरून त्यांच्या बरोबर पुन्हा परतीच्या प्रवासाला लागलो. सायकलवरून प्रवास करून विहाळ येथे आलो. असा एकंदर २५० किलोमीटरचा प्रवास पूर्ण केला !

माझ्या या प्रवासात मला प्रेरणा देणारे मित्र नाना मारकड, सुनील मारकड यांनी मानसिक बळ दिले तसेच मदतही केली. त्यानंतर पानाचंद देवकते यांनी मोटार सायकलवरून साथ केली. पानाचंद देवकते यांनी प्रोत्साहन देताना सांगितले, की.. अलिकडच्या काळात सायकलींगचे महत्व खूप वाढले आहे, अलिकडे लोक चालत नाही, व्यायाम नाही, कुठेही जायचे म्हटले तरी मोटार सायकलचा वापर करतात. त्याने प्रदुषण होते. आरोग्य राहत नाही. त्यामुळे भावी पिढीसाठी सायकलिंग ही एक फार मोठी प्रेरणा आहे. सायकलिंगचे अनेक फायदे आहेत. तुझा उपक्रम लोकांना मार्ग दाखविणारा आहे. पानाचंदच्या कौतुकाने आणखी प्रेरणा मिळाली.

माझी ही कल्पना मी गरी, पत्नीपासूनही लपवून ठेवली होती. कारण घरी माहित झाले असते तर माझे सायकलिंग पूर्ण झाले नसते. असो.. श्री भैरवनाथ, श्री बाळूमामा, ग्रामस्थ आणि मित्रमंडळ यांच्या आशिर्वादाने माझी ही यात्रा पूर्ण झाली याचा मनस्वी आनंद आहे.

**....राजाभाऊ देवकते, विहाळ**

**सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी २०० रू. भरून वर्षेभर घरपोच अंक मिळवा..!**

महाराष्ट्रात प्रथमच...
गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय ?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामुक्त व्हा...
आता जुन्या बॅटरी चालतील नव्यासारख्या !
२ चाकी ३ चाकी ४ चाकी ट्रक ट्रॅक्टर JCB पोक्लेन सोलर
एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस
सुभद्रा पॉवर सोल्युशन्स
प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337
श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे 7588506719
शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.

स्थलांतर..
३० वर्षापासून आपल्या अखंड सेवेत..
स्थलांतर..
शांतिसागर बँगल्स स्टोअर
हे दुकान..... स्टेट बँकेशेजारी, राशिनपेठ, करमाळा येथे चालू आहे.
बांगड्याचे होलसेल व्यापारी
आपल्या लाडक्या मुला-मुलींच्या लग्नासाठी लागणाऱ्या बांगड्या होलसेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण !
संपर्क : मो.नं.9766075378
पत्ता : स्टेट बँकेशेजारी, राशिनपेठ, करमाळा

यशोदीप प्रा.लि;
आपल्या सेवेत घेऊन आलो आहोत..
"सर्वसोयीनेयुक्त"

# यशोदीप मंगल कार्यालय

पत्ता : यशोदीप नगर, निलज रोड, करमाळा.
प्रोप्रा : संदीप दिलीपराव बोकन

दैवत.. आई-वडिलांचा शुभ-आशिर्वाद




**वैशिष्ट्ये**

- शहरापासून ५ मिनीटाच्या अंतरावर
- शांत व निसर्गरम्य वातावरण
- प्रशस्त डायनिंग हॉल
- सुसज्ज बैठक व्यवस्था
- भव्य ४ एकर पार्किंग व्यवस्था
- सुसज्ज सहा रूम
- संपूर्ण परिसर सीसीटीव्ही कॅमेरा
- छोट्या कार्यक्रमासाठी छोटा हॉल उपलब्ध.

बुकींग सुरू

एकदा येवून तर पहा.. आपण सुध्दा म्हणताल..
मंगल कार्यालय म्हणजे... आपलं.. यशोदीपचं !
आपलं लाडक्यांसाठी.. आपलं हक्काचं..
आपलं 'यशोदीप मंगल कार्यालय' !

## सर्व प्रकारच्या ऑर्डर स्विकारल्या जातील.

- लग्न
- वाढदिवस
- नामकरण
- साखरपुडा
- स्वागत समारंभ
- रिसेप्शन
- गेट टुगेदर
- डोहाळे जेवण
- बैठक, मिटींग

संपर्क : यशोदीप ज्वेलर्स, दत्तपेठ, करमाळा. (9405713769, 9423069349)




करमाळा नगरपरिषद संचलित

# श्री ज्ञानेश्वर वाचन मंदिर मुक्तद्वार वाचनालय

'अमृतमहोत्सवी' वर्धापन दिनास...

हार्दिक शुभेच्छा...



- **श्री.सचिन धोंडिराम तपसे**
  मुख्याधिकारी तथा प्रशासक, करमाळा नगरपरिषद

**कर्मचारी वृंद**

- **श्री.दत्तात्रय भिकू घोलप** (ग्रंथपाल)
- **श्री.प्रदीप बाबुशा चौकटे** (ग्रंथालय मदतनीस)
- **श्री.अमोगसिध्द सिध्दाराम परशेट्टी** (सेवक)

शुभेच्छुक

**शैलेश मधुकर खडके** (B.E.Civil)
इंजिनिअर ॲन्ड गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर
पत्ता : शिवाजीनगर, करमाळा, जि.सोलापूर

# करमाळा येथे वक्फ सुधारणा विधेयकाचा जाहीर निषेध



करमाळा(सं.प्र.) : वक्फ सुधारणा विधेयकाचा जाहीर निषेध करत हे विधेयक त्वरीत मागे घेण्यात यावे; अशा मागणीचे निवेदन करमाळा मुस्लिम समाजाच्या वतीने अध्यक्ष व माजी नगरसेवक हाजी अल्ताफशेठ तांबोळी यांच्या हस्ते तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे, की वक्फ सुधारणा विधेयक दोन मुस्लिम समाजाच्या विरोधात असून हे विधेयक घाईगडबडीत पास करून एका समाजाविषयी केंद्र सरकारने घेतलेला निर्णय निषेधार्थ आहे. केंद्र सरकारचा निर्णय भारत देशात राहणाऱ्या ३५ कोटी मुस्लिम समाजाच्या हिताच्या विरोधात आहे. विधेयक व त्यातील तरतुदी या संविधानाच्या कलम २१, २५ व ३० या तरतुदीचे सर्रास उल्लंघन करीत असून, देशात राहणाऱ्या नागरीकांच्या धर्म स्वातंत्र्य व मुलभूत अधिकारावरच गदा आणत आहे. तरी सदरचे विधेयक मागे घ्यावे; अशी मागणी निवेदनात केली आहे. यावेळी अमीर तांबोळी, अमीन बेग, अतिक बेग, मुस्ताक शेख, बिलाल मदारी, नजीर मदारी, समीर शेख, असीम बेग, अफरोज पठाण, जुबेर मिर्झा यांचेसह मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# श्री गजानन अगरबत्ती

- सुगंधी अगरबत्ती • कापूर
- अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
- विविध कलरची रांगोळी
- सर्व प्रकारचे लोबन,
- सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य योग्य दरात मिळेल !



पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)


पान १ वरून पुढे...

# शनिवारी रोजगार हमी मंत्र्यासह पालकमंत्री करमाळ्यात

तसेच सकाळी अकरा ते दोन रत्न निधी ट्रस्ट मुंबई तर्फे दिव्यांग व्यक्तींच्या अवयवाची मोजमाप घेतली जाणार आहेत. (अशा लाभार्थींना येत्या १५ दिवसात मोफत हात व पाय (जयपूर फुट) अवयव वाटप केले जाणार आहे.) सायंकाळी चार वाजता करमाळा शहरातील जनतेसाठी तुळशी वृंदावन लोकार्पण सोहळा श्रीदेवीचामाळ रोड येथे होणार आहे. तसेच सायंकाळी सव्वाचार वाजता ज्येष्ठ पत्रकार नरसिंह चिवटे यांचा वाढदिवसानिमित्त नागरी सत्कार करण्यात येणार आहे. तरी या कार्यक्रमास नागरीकांनी उपस्थित रहावे; असे आवाहन चिवटे परिवाराच्या वतीने करण्यात आले.

# दहिगावच्या पाण्यासाठी सालसे येथे रास्ता रोको



करमाळा(सं.प्र.) : दहिगाव उपसा सिंचन योजनेचे पाणी टेल भागास मिळावे.. या मागणीसाठी घोटीचे सरपंच विलास राऊत व निंभोरेचे सरपंच रविंद्र वळेकर यांच्या नेतृत्वाखाली सालसे येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. जोपर्यंत दहिगाव योजनेचे पाणी आम्हाला मिळत नाही तोपर्यंत आम्ही रास्ता रोको सुरूच ठेवणार, आम्ही उठणार नाही; अशी भुमिका शेतकऱ्यांनी घेतली होती. लेखी आश्वासन दिल्यांनतर आंदोलन मागे घेण्यात आले. याप्रसंगी शिवाजी राऊत, प्रशांत शेंडे, बाळासाहेब राऊत, सतीश राऊत, धनाजी राऊत, दिनेश निकम, तानाजी ननवरे, अमोल भोसले, पांडुरंग राऊत, रामा राऊत, कांतीलाल राऊत, महेश राऊत, संजय राऊत, बाळासाहेब ननवरे, संभाजी म्हैत्रे, राहुल दुधे, गणेश बदर, हिराजी राऊत, किसन शिंदे, हनुमान मोलाने, गणेश कदम, भारत राऊत, अमित निकम, भैरवनाथ जाधव, अक्षय खरात, उपसरपंच संतोष पाटील, दत्ता वळेकर, ईश्वर मस्के, सोमा गुरव, सतीश पन्हाळकर, रणजित देवकर, मयुर पाटील आदी उपस्थित होते. पाटबंधारे विभागाने आवश्यक ती कार्यवाही करून टेल भागास पाण्याचा लाभ देण्याचे प्रयत्न केले जाईल तसेच पुढील सिंचन आवर्तनापासून टेल टू हेड आवर्तन कार्यक्रम राबविण्यात येईल; असे सांगितले.

> शेतकऱ्यांच्या रोषाला अधिकारी व कर्मचाऱ्यांना सामोरे जावे लागत आहे. लोकप्रतिनिधीच्या अति हस्तक्षेपामुळे २४ गावांची वरदायिनी असलेल्या दहिगाव उपसासिंचन योजनेच्या उन्हाळी आर्वतना चा पूर्ण बट्ट्याबोळ झालेला असून त्यांच्या नियोजन शुन्य कारभारामुळे शेतकऱ्यांचे कोट्यावधी रूपयांचे नुकसान झालेले आहे. अशी प्रतिक्रिया विलास राऊत यांनी दिली


आरामदायक व सुखकर प्रवासासाठी एकच नांव...



# जय बजरंगबली
## टूर्स & ट्रॅव्हल्स पोंधवडी, ता.करमाळा.

**• गुजरात दर्शन**
गिरनार पर्वत, जुनागड, सोरटी सोमनाथ पोरबंदर, द्वारका, गिर अभयारण्य
कालावधी : दि.५/५/२०२५ ते १४/५/२०२५
सहल खर्च : रू.११,०००

**• वैष्णोदेवी, काश्मिर, अमृतसर दर्शन**
माता वैष्णोदेवी, श्रीनगर, गुलमर्ग, सोनमर्ग, पेहलगाम, अमृतसर इ.
कालावधी : दि.१५/५/२०२५ ते २७/५/२०२५
सहल खर्च रू.३०,५०० (रेल्वे प्रवास ३ एसी)

**• कन्याकुमारी दर्शन**
कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, मदुराई, रामेश्वरम्, तिरूपती बालाजी
कालावधी : दि.२/६/२०२५ ते १०/६/२०२५
सहल खर्च : रू.१३,८००

**• चारधाम दर्शन**
कालावधी : दि.१३/६/२०२५ ते २८/६/२०२५
सहल खर्च : रू.३५,०००


**• त्रिस्थळी दर्शन यात्रा**
श्री काशी विश्वनाथ गया, अयोध्या, प्रयाग
सहल खर्च : रू.१४,८००
कालावधी : दि.२७/७/२०२५ ते २/८/२०२५

• रेल्वे प्रवास • बस प्रवास • भोजन व्यवस्था • राहण्याची उत्तम सोय




संपर्क श्री.मयुर राऊत
मो.८८८८३३३६३८ / ८६९८३३३६३८





# प्रियंका आय केअर हॉस्पीटल



पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600

उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र

- मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
- जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
- फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर • नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
- लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
- एस्कॅन बायोमेट्री आणि केरॉटोमेट्री

डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन

अत्याधुनिक प्रकारची लेझार सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)

आदिका मेडिकल, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर

# 3 BHK रो-बंगलो



**वैशिष्ट्ये**

- स्वतंत्र प्रशस्त पार्किंग
- स्वतंत्र जीना
- वास्तुशास्त्राप्रमाणे बांधकाम
- सर्व ब्रॅन्डेड अमेनिटीज्सह दर्जेदार बांधकाम
- स्वतंत्र बोअरवेल्स
- कंन्सील्ड इलेक्ट्रीक फिटींग
- आर.सी.सी.इमारत
- डबलचार्ज टाईल्स व ग्रेनाईट
- पावडर कोटेड अल्युमिनीयम ३ ट्रॅक स्लाईडिंग विंडो
- स्वतंत्र कंपाउंड वॉल, पार्किंग स्टाईलसह

नवभारत इंग्लीश स्कुल 100 मीटर अंतरावर

प्रतापसिंह महाविद्यालय 500 मीटर अंतरावर

**945 स्क्वे.फुट जागा**

**1260 स्के.फुट बिल्टअप एरिया**

बुकींगसाठी संपर्क...
मो.9970795819
मो.8888229828

**साईट पत्ता : बागवान नगर, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर**







# अभिनंदन व शुभेच्छा !

विहाळ येथील सुपुत्र
**मा.श्री.राजाभाऊ देवकते** यांनी पुणे(कात्रज) ते विहाळ असा १५५ कि.मी. प्रवास सायकलने एकाच दिवसात विक्रमी वेळेत पूर्ण केला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी विहाळ ते सोनारी व सोनारी ते विहाळ असा ११५ कि.मी. प्रवास श्री भैरवनाथाच्या ज्योतीबरोबर पूर्ण केला. दोन दिवसात २७० कि.मी. प्रवास सायकलवरून पूर्ण केल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन ! त्यांनी या उपक्रमातून युवकांना काही तरी नवीन वेगळी दिशा देण्याचे काम केले. त्यांच्या उपक्रमास हार्दिक शुभेच्छा !

**शुभेच्छुक**



गोकुळशेठ बरकडे प्रताप मारकड बापू मोरे बाळासाो कांबळे विनोद भुजबळ शरद मारकड गणेश गार्डे



धर्मवीर वैद्यकिय मदत सामाजिक संस्था ठाणे संचलित

College Code : 1384

# श्रीमती गंगुबाई संभाजी शिंदे इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग (कॉलेज), करमाळा.

## ग्रामीण भागातील मुला-मुलींसाठी 'नर्सिंग' क्षेत्रात करिअरची सुवर्णसंधी !

**G.N.M. डिप्लोमा कोर्स**

# प्रवेश देणे सुरू

- **कालावधी :** ३ वर्षे
- **शैक्षणिक पात्रता...** १२ वी पास (सायन्स/कॉमर्स/आर्टस्)

**मान्यताप्राप्त..**

- महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त
- महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक मंडळ, मुंबई
- महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल, मुंबई

- १००% नोकरीची हमी
- सर्व शासकीय शिष्यवृत्तींचा लाभ
- फक्त मुलींसाठी मोफत प्रवेश..
- जॉब प्लेसमेंट
- हॉस्टेल सुविधा
- हॉस्पीटल व्हिजीट्स व प्रशिक्षण
- इंग्लिश स्पीकींग क्लासेस



**सुविधा...**

- राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, शासकीय, निमशासकीय परदेशात, नगरपालिका, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रूग्णालय, खाजगी रूग्णालय, जिल्हा परिषद रूग्णालयामध्ये १००% नोकरीची सुवर्णसंधी !
- मुलींकरीता सर्व सोयीनीयुक्त होस्टेल व मेसची सुविधा.
- प्रात्यक्षिक व क्षेत्रीय अनुभवासाठी सुपर मल्टी-स्पेशालिटी रूग्णालय, मनोरूग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रूग्णालये.
- सुसज्ज लॅब, इमारत, भव्य ग्रंथालय, सुसज्ज कॉम्प्युटर लॅब.
- अनुभवी प्राध्यापक वर्ग, नामांकित हॉस्पीटलशी संलग्न नोकरीची हमी.
- एस.सी./एस.टी. विद्यार्थ्यांना (शासकीय नियमानूसार) १००% शिष्यवृत्ती सुविधा उपलब्ध.

**पत्ता : अमरनाथ टॉवर, तिसरा मजला, श्रीदेवीचामाळ रोड, करमाळा. फोन : (०२१८२)२११५४७, ९५४५६२०१११**

**२४ तास आपल्या सेवेत**

# मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे चॅरिटेबल हॉस्पिटल, करमाळा.

**डॉ.ओंकार अभिमन्यु उघडे-पाटील** M.B.B.S. (Gen.Physician) यांचे तज्ञ मार्गदर्शन व तपासणी

**सुविधा :** ॲडमीट, ऑपरेशन व सर्व रोगनिदान मेंदू-मणका व गुडघे/संधिवात, त्वचारोग, स्त्रीरोग तज्ञ

टीप : दर आठवड्याला तज्ञ डॉक्टरांची व्हीजीट सेवा

**तपासणी फी फक्त Rs.100/-**

**पत्ता : अमरनाथ टॉवर, दुसरा मजला, श्रीदेवीचामाळ रोड, करमाळा. मो.८४४६१३९५१३**







## आदिनाथ साखर कारखान्याच्या निवडणुकीसाठी ६०.७९ टक्के मतदान





करमाळा(सं.प्र. ) : आदिनाथ सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीसाठी ६०.७९ टक्के झाली असून १९ एप्रिलला मतमोजणी होणार आहे. आदिनाथ कारखान्याच्या निवडणुकीसाठी ७२ मतदान केंद्रावर मतदान झाले. मतदान सर्वत्र शांततेत पार पडले. २९ हजार ०३९ मतदानापैकी १७ हजार ६५४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. यामध्ये १५ हजार २२४ पुरूष व २४३० महिलांनी मतदान केले. निवडणुकी दरम्यान कोठेही अनुचित प्रकार घडलेला नाही. सर्वत्र शांततेत मतदान झाले आहे. १९ एप्रिलला यशवंतराव चव्हाण महाविद्यालय येथे मतमोजणी होणार असून त्यासाठी ७२ टेबल लावलेले आहेत. सायंकाळी उशीरापर्यंत निकाल येण्याची शक्यता आहे. आमदार नारायण पाटील, माजी आमदार संजयमामा शिंदे यांनी विजयाचा दावा केला आहे तर प्रा.रामदास झोळ यांनी कडवी झुंज दिली आहे.

# घरी मुलगी जन्मताच दहा रोपे लावा; शिक्षणाला तीन लाख रूपये मिळवा

## वनविभागाची कन्या वन समृध्दी योजना

करमाळा(सं.प्र.) : शेतकरी कुटूंबात मुलगी जन्मली तर सामाजिक वनीकरण विभागाकडून दहा रोपे मोफत मिळतात. यात सागवान, फणससह इतर रोपांचा देखील समावेश आहे. रोपांची पूर्ण वाढ झाल्यास त्यापासून मिळणारे उत्पन्न चार लाख रूपयापर्यंत सहज होते. हे पैसे मुलीच्या शिक्षणासाठी वापरता येतात.



दिवसेंदिवस पर्यावरणात बदल होत आहे. त्यावर प्रभावी उपाययोजना म्हणून मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड केली जात आहे. तसेच वनविभागाकडून अनेक योजना राबविल्या जात आहेत. मात्र या विविध योजनेची अनेक नागरीकांना माहितीच नसते. एक सागवानाचे पूर्ण वाढ झालेल्या झाडाची किंमत ५० हजार रूपयांपेक्षाही जास्त असते. इतर फळांच्या झाडापासूनही उत्पन्न मिळते.

सामाजिक वनीकरणाच्या रोपवाटिका मधून ग्रामपंचायत मार्फत ५ सागवान, २ आंबा,१ फणस, १ जांभुळ, १ चिंच अशी रोपे दिली जातात. एकंदरीत दहा झाडांची लागवड पूर्ण झाल्यानंतर लागवड केलेल्या ठिकाणाचा तपशील, रोपाचे फोटो तसेच संबंधित शेतकऱ्यांमार्फत ग्रामपंचायतीला सादर करणे बंधनकारक आहे. ही माहिती ग्रामपंचायती मार्फत एकत्रित करून तालुकास्तरावरील वनक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण यांना दरवर्षाला ३१ जुलै रोजी पर्यंत पाठवायची असते. ज्या शेतकऱ्यांच्या कुटूंबात जास्तीत जास्त दोन मुली जन्माला येतील व त्यानंतर कुटूंबातील अपत्यांची संख्या नियंत्रित केली जाईल. तसेच १ मुलगा किंवा १ मुलगी अथवा दोन्ही मुली ज्या कुटूंबात असतील त्यांनाच या योजनेचा लाभ दिला जातो. यासाठी ग्रामपंचायतमध्ये मुलीच्या नावाची नोंद करून अर्ज करणे आवश्यक आहे.


**झाडापासूनचे उत्पन्न मुलीसाठी**

लागवड केलेल्या झाडांची निगा, संरक्षण, संगोपन आणि झाडे जिवंत राहण्याचे प्रमाण उच्च रहावे; याकरीता शेतकऱ्यांना तांत्रिक सल्ला सामाजिक वनीकरणाकडून दिला जाईल. लागवड केलेल्या झाडांपासून मिळणारे सर्व उत्पन्न मुलीचा कौशल विकास, उच्च शिक्षण आणि रोजगार मिळवणे व मुलीच्या उज्वल भविष्यासाठी शेतकऱ्यांना त्यांच्या ऐच्छिकतेनुसार वापरण्यास मुभा राहील.

# कमलादेवी मंदिराच्या कामास विद्या बोबे यांची ११ हजाराची देणगी

करमाळा(सं.प्र.): श्रीदेवीचामाळ येथील श्री कमलादेवी मंदिर जतन व संवर्धनाच्या कामास करमाळा येथील विद्या नारायण बोबे यांच्याकडून अकरा हजार रूपयाची देणगी प्राप्त झाली आहे. यापूर्वी विद्या बोबे यांचे पती नारायण बोबे यांनी २१ हजार रूपयाची देणगी दिली होती. यानिमित्त मंदिर समितीच्या वतीने नारायण बोबे व विद्या बोबे यांचा कमलादेवीची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मंदिर समितीचे सर्व सदस्य, व्यवस्थापक अशोक गाठे,रघुनाथ खटके आदीजण उपस्थित होते.




करमाळा शहरात प्रथम सुरु..!
Reg no.42433
**डॉ.सौ.अर्चना दिनेश पाटील**
( Clinical Cosmetologist & Trichologist )
**पाटील स्किन, हेअर अँन्ड जनरल क्लिनिक**
उपलब्ध सुविधा
• **त्वचा :** P.R.P. चिकित्सा, I.P.R.F. चिकित्सा, P.R.P. मायक्रोनीडलिंग, अँटी येजिंग थेरपी, मुरुम व मुरूमाचे डाग घालवणे, वांग व व्रण घालवणे, चेहऱ्यावरील सुरकुत्या घालवणे, ब्रायडल फेशियल, मेडी फेशियल, हायड्राफेशियल, स्किन पोलिशिंग, चामखीळ काढणे, मस काढणे, पर्मनंट आयब्रो, पर्मनंट लिप कलर
• **केस :** P.R.P.चिकित्सा, I.P.R.F.चिकित्सा, I.J.F.C.थेरपी, टक्कल पडणे, केस गळणे, केसातील कोंडा घालवणे, केसांची वाढ खुंटणे, केस पांढरे होणे, चाई पडणे


• सर्व आजारांवर उपचार • रक्त लघवी तपासणी • लहान मुलांना वाफ देणे • सांधेदुखी, कंबरदुखी • होमिओपॅथिक उपचार
पत्ता : संगोबा रोड, श्रीदेवीचामाळ, करमाळा. मो.9604801573



**समर्थ बालरूग्णालय स्त्रीरोग व प्रसुतीगृह**
डॉ.वृषाली अभिजित हंकारे (M.B.B.S. D.G.O) | डॉ.उदयसिंह नामदेव गायकवाड (M.B.B.S. D.C.H)
**उपलब्ध सुविधा..** • गरोदर माता तपासणी व उपचार • सुसज्ज प्रसुतीगृह व ऑपरेशन थिएटर • नॉर्मल आणि अति जोखमीची बाळंतपणे • मासिक पाळीचे आजार निदान व उपचार • वंध्यत्व निवारण • सिझेरियन प्रसुती • गर्भशयाचे आजार निदान व उपचार • मेनोपॉज क्लिनिक
महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत गरीब व गरजू रूग्णांसाठी ठराविक गंभीर आजारावर मोफत उपचार (MJPJAY)
• नवजात अर्भक अतिदक्षता विभाग (NICU) • व्हेंटिलेंटरची सोय
• बालरोग अतिदक्षता विभाग (PICU) • CPAP • Pulsoximeter
• दररोज लसीकरण सुविधा (Vaccination) • वाफेची सोय (Nebulizer)
• बाल दमा निदान व उपचार • सेंट्रल ऑक्सिजनची सोय • 02 Concentrator
गायकवाड चौक, करमाळा. (०२१८२-२२००५७, ९१४६४३०५५०)


# पाच वर्षाला नवीन रेशनकार्ड वाटप करण्याची मोहिम पुन्हा सुरू करावी

करमाळा(सं.प्र.) : तहसील कार्यालय मार्फत प्रत्येक पाच वर्षाला नवीन रेशनकार्ड वाटप करण्याची मोहिम २५ वर्षापासून बंद असून ती मोहिम पुन्हा सुरू करावी; अशी मागणी नेरलेचे माजी सरपंच औदुंबरराजे भोसले यांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की तहसील मार्फत प्रत्येक पाच वर्षाला नवीन रेशनकार्ड वाटप करण्याची मोहिम तलाठी, स्वस्त धान्य दुकानदार, कोतवाल यांच्या मार्फत १९९७ ते २००० पर्यंत देश स्वातंत्र्यापासून राबवली जात होती. त्या माध्यमातून जन्मलेल्या बालकाचे, लग्न होऊन आलेल्या महिलेचे शिधापत्रिकेत नाव समाविष्ट केले जात होते.नवीन वास्तव्यास आलेल्यांना नवीन रेशनकार्ड दिले जायचे तसेच मयत झालेल्या व लग्न होऊन परगावी गेलेल्या, नोकरी व्यवसायनिमित्त परगावी गेलेल्यांची नावे कमी केली जात होती. प्रत्येक कुटूंबाकडून फॉर्म भरून शिधापत्रिकेची सरकारी फी घेऊन नवीन शिधापत्रिका दिले जायचे. त्यामुळे नागरीकांना तहसील कार्यालय येथे येण्याची गरज पडत नसे. एखाद्या व्यक्तीला तात्काळ नाव कमी करण्याचे किंवा वाढवण्याची गरज असेलतरच तहसील येथे जावे लागत असे. त्यामुळे अधिकारी, कर्मचारी किंवा नागरीकांना देखील त्रास होत नव्हता. सन १९९७-९८ साली दारिद्ररेषेचा सर्व्हे होऊन यादीतील लोकांना पिवळे रेशनकार्ड व इतरांना केसरी कार्ड २००० साली वाटप केले. कार्ड संपल्यामुळे पुरवणी देण्यात येत आहे. त्यानंतर २५ वर्ष कार्ड वाटप न केल्यामुळे प्रत्येक कार्डधारकाला तहसील पुरवठा कार्यालय येथे जाऊनच अर्ज करावा लागत आहे. अर्ज केल्यानंतर वर्ष-दोन वर्ष हेलपाटे घालून देखील त्यांना नवीन कार्ड, नाव समाविष्ट करणे, कमी करणे अशी कामे होत नाहीत. आज कार्ड संपूर्ण जीर्ण झाली आहेत. काही नागरीक वृध्दापणामुळे पैशाअभावी करमाळा येथे जाऊन अर्ज करू शकत नाहीत. त्यामुळे २५ वर्षापासून त्यांचे कार्ड बंद आहेत. ते धान्यापासून व इतर लाभापासून वंचित आहेत. त्यामुळे सदरची मोहिम पुन्हा चालू करून नागरीकांचा त्रास कमी करावा; अशीही मागणी औदुंबरराजे भोसले यांनी लेखी निवेदनात केली


उन्हाळ्याची सुट्टी लागली.., काय करायचे ? हा पालकांसमोर प्रश्न !
यशाची उज्वल परंपरा असलेले...
तिमिराकडून तेजाकडे..
**मुथा नॉलेज फाऊंडेशन**
घेऊन येत आहोत..
■ अल्प कालावधीचे विविध कोर्सेस ■
**अबॅकस** ब्रेन शार्पनिंग प्रोग्राम (इ.१ली ते इ.७ वी)
**वैदिक मॅथ** √1369=?? फक्त काही सेकंदात अचुक गणिते सोडवणारा प्रोग्राम (इ.६ वी ते इ.१२ वी)
**हस्ताक्षर सुधारणा** मोत्यासारखे सुंदर अक्षर (अक्षर संस्कार)
**RUbIC CUBE** मोबाईलपासून विद्यार्थी दूर राहण्यासाठी 2-2, 3-3, पिरॅमिड, 4-4 Mirror (best प्रोग्राम)
दि.१५ एप्रिल २०२५ पासून नवीन बॅच सुरू..!
आपल्या पाल्याचे नाव नोंदविण्यासाठी अवश्य भेट द्या..!
पत्ता : मुथा अबॅकस अकॅडमी, मंगळवारपेठ, करमाळा.(9730505153. 9096471003)


22 April
कर्तव्यदक्ष मा.नगरसेवक व आमचे मित्र
मा.श्री.संजय(पप्पू) सावंत
यांना वाढदिवसाच्या लाख.. लाख..
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
गजानन स्पोर्टस् ॲन्ड सोशल क्लब
वेताळपेठ, करमाळा.
श्री.प्रशांत ढाळे (मा.नगराध्यक्ष)


अभिनंदन व शुभेच्छा !
विहाळ येथील सुपुत्र
मा.श्री.राजाभाऊ देवकते यांनी पुणे(कात्रज) ते विहाळ असा १५५ कि.मी. प्रवास सायकलने एकाच दिवसात विक्रमी वेळेत पूर्ण केला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी विहाळ ते सोनारी व सोनारी ते विहाळ असा ११५ कि.मी. प्रवास श्री भैरवनाथाच्या ज्योतीबरोबर पूर्ण केला. दोन दिवसात २७० कि.मी. प्रवास सायकलवरून पूर्ण केल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन ! त्यांनी या उपक्रमातून युवकांना काही तरी नवीन वेगळी दिशा देण्याचे काम केले. त्यांच्या या उपक्रमास हार्दिक शुभेच्छा !
श्री.राजाभाऊ देवकाते
शुभेच्छुक
दत्तात्रय डोंबाळे
राजाराम मारकड
भैय्या वाकसे
सुनील कुराडे
दादासाहेब रोडे
नामदेव गलांडे
सतीश मारकड-पाटील (नगरसेवक, पुणे)


भावपूर्ण श्रध्दांजली
मनी होता साधेपणा
कधी न दाखवला मोठेपणा
होता चेहरा हसरा,
जसा माणुसकीचा झरा
उरली नाही साथ आम्हाला
आठवण येते क्षणाक्षणाला !
करमाळा येथील आडत व्यापारी
स्व.संतोष जयकुमार व्होरा
यांचे दि.१२ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांच्या कुटूंबियाच्या दु:खात आम्ही सहभागी असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, हीच ईश्वर चरणी प्रार्थना व त्यांच्या स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली !
शोकाकुल
• राजकुमार नेमचंद दोशी • सुदर्शन हिरालाल गांधी • बिपीन प्रेमचंद दोशी • कन्हैयालाल गिरधरदास देवी • सुशिल विनोद कटारिया
यश कलेक्शन मेनरोड, करमाळा. (मो.9150311008)


# 'आप्पा' पत्रकारच नाहीतर एक जागृत नागरीक

करमाळा शहराचा भारतीय स्वातंत्र्य लढ्यात खुप मोलाचा वाटा आहे. करमाळा शहर व तालुक्यातील स्वातंत्र्यसैनिकांची यादी ही जवळपास ४० च्या पुढे आहे. परंतु आज अनेक स्वातंत्र्यसैनिक हयात नाहीत. करमाळा तालुक्याचा भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील वाटा हा मुख्यत्वे १९४२ च्या चले जाव चळवळीतील होता. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी चले जावचा नारा दिला आणि ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले होते. या आंदोलनास संपूर्ण देशातून गावोगावी प्रचंड प्रतिसाद मिळाला होता. करमाळा शहराला या सर्व ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांविषयी प्रचंड आदर आहे.

करमाळा येथील थोर स्वातंत्र्य सैनिक कै.मनोहरपंत चिवटे सुरूवातीच्या काळापासून पत्रकार होते. त्यांनी पुणे येथून निघणाऱ्या केसरी, सकाळ मध्ये वार्ताहार म्हणून काम केले. स्वातंत्र्य चळवळीसाठी त्यांनी आपली लेखणी खर्ची घातली. त्यातूनच कै.मनोहरपंत चिवटे यांनी पुढे स्वातंत्र्य लढ्यामध्ये उडी घेतली आणि आपलं उभं आयुष्य स्वातंत्र्य चळवळीसाठी झोकून दिले. त्यांच्यानंतर नरसिंह चिवटे यांनी आपल्या वडिलांचा पत्रकारितेचा वारसा समर्थपणे चालवला आहे.

करमाळा शहरातील ज्येष्ठ पत्रकार शहरभूषण नरसिंह मनोहरपंत चिवटे तथा नरसाप्पा चिवटे यांचा जन्म १९ एप्रिल १९४० रोजी झाला. बालपण अतिशय संघर्षातून, गरीब परिस्थितीतून गेले. त्यामुळे आपल्या आई-वडिलांचे संस्कार व आदर्श डोळ्यासमोर ठेवत आप्पांनी आपली वाटचाल ठेवली. महात्मा गांधी विद्यालयात त्यांनी नववी पर्यंत शिक्षण पूर्ण केले. माणुस पुस्तकी ज्ञानापेक्षा अनुभवातून व येणाऱ्या प्रसंगातुनच खऱ्या अर्थाने शिक्षण घेत असतो हेच खरे. नेमकी तीच गोष्ट आप्पांच्या बाबतीत घडली असं म्हणावं लागेल. एवढं कमी शिक्षण असूनही अनुभवाची प्रचंड मोठी शिदोरी त्यांच्या पाठीशी आहे. कलेक्टर पासून ते मुख्यमंत्र्या पर्यंत आप्पांना मान-सन्मान आहे, तो याच कारणामुळे. आप्पांनी आपला स्वाभिमान कधीही गहाण ठेवला नाही. पत्रकारितेची लेखणी चालवत समाजप्रबोधन करीत आपल्या वयाची ८४ वर्ष पूर्ण करून ते आज ८५ वा वाढदिवस साजरा करीत आहेत.

वास्तविक पाहता पत्रकार हा



समाजाचा चौथा स्तंभ आहे, असे म्हणतात. या क्षेत्राला न्याय देण्याचा आप्पांनी नुसता प्रयत्नच केला नाही तर पत्रकारांना त्यांच्यामुळे सन्मानही प्राप्त झाला असे म्हणावे लागेल. १९८२ साली बिहार राज्यात पत्रकारितेवर गदा आणणारा प्रेस अॅक्ट लावला गेला होता. पत्रकारितेचे मुलभूत स्वातंत्र्य हिरावून घेणारा हा कायदा असल्याने मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने महाराष्ट्रात पत्रकारांची उग्र निदर्शने झाली होती. यावेळी सोलापूर येथे दै.संचार चे संस्थापक संपादक कै.रंगा आण्णा वैद्य यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन झाले होते. याच आंदोलनात नरसिंह चिवटे सहभागी झाले होते. यावेळी १०० हून अधिक पत्रकारांना १२ दिवसांसाठी औरंगाबाद येथील हार्सूल कारागृह येथे अटकेत ठेवण्यात आले होते. त्यामध्ये नरसिंह चिवटे यांचा देखील समावेश होता.

आप्पा हे राज्याच्या स्वातंत्र्यसैनिक उद्याधिकार समितीचे अध्यक्ष होते. त्यांच्या कारकिर्दीत या समितीकडून भरीव काम केले गेले. स्वातंत्र्यसैनिकांच्या वारसांची संपूर्ण माहिती शासनाला सादर केली गेली. त्यांच्या अनेक प्रश्नांना आप्पांनी वाचा फोडली. आप्पा नुसते पत्रकारच नाहीतर एक जागृत नागरीक म्हणून सातत्याने कार्यरत आहेत. ते आजही तेवढ्याच उत्साहाने एखाद्या युवकाला लाजवेल असं काम करतात. आपल्या करारी आवाजाने त्यांनी अनेकदा मोठ्या मोठ्या अधिकाऱ्यांची प्रश्न विचारून भंबेरी उडवली आहे. करमाळा शहर व तालुक्याच्या विकासाच्या बाबतीत अनेकदा तत्कालीन आमदार व माजी मंत्री स्व.दिगंबरावजी बागल मामा यांना ते नेहमीच मार्गदर्शन करीत असत. स्व.मामा व चिवटे परिवाराचे एक स्नेहाचे व मैत्रीचे नाते होते.

आप्पांचे सुभाष चौकात खताचे दुकान होते. त्यावेळी आप्पांची भेट व्हायची. आप्पांबरोबर तास-दोन तास विविध विषयांवर चर्चा व्हायची. ती चर्चा म्हणजे एक प्रकारे ज्ञानाचा व अनुभवातून आलेल्या क्षणांचा प्रचंड खजिनाच होता. थोडासा मिश्कील व नर्म विनोदी स्वभाव अशी आप्पांची शैली आहे. दिग्विजय बागल व रश्मी बागल यांनी आयोजित केलेल्या कृषी प्रदर्शनात आठवणीचे मामा दालनासाठी स्वत:चे मामांसोबतची काही दुर्मिळ छायाचित्रे घेऊन आप्पां बागल बंगल्यावर भर उन्हात गेले. त्यावेळी आप्पांनी कृषी प्रदर्शनाची चांगली कल्पना राबवत असल्याबद्दल बागल परिवाराचे कौतूक केले.

आज आप्पांची मुले महेश हे पत्रकार संघाचे अध्यक्ष व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख असून मंगेश हा माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांचे विश्वासू विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. पत्रकारितेबरोबरच चिवटे कुटूंबिय अनेक उद्योग व्यवसायामध्येही स्थिरस्थावर झाले आहे, हेही कौतुकास्पद आहे. आप्पांच्या कन्या मनिषाताई वासकर या सध्या पंढरपूर येथे आहेत. त्याही आपल्या महेश व मंगेश या बंधुप्रमाणे सामाजिक कार्य करत असतात. त्यांनी पंढरपूर शहरात गेली दोन वर्षपूर्वी भव्य असे मोफत आरोग्य शिबीर आयोजित केले होते. दुसरी कन्या भारतीताई या बार्शी येथे आहेत. म्हणजे दोन कन्या, दोन जावई, दोन मुले, दोन सुना व नात-नाती यांच्यासह आज आप्पा आपल्या परिवारात खूप समाधानी व आनंदी आहेत. आपल्या नातवांबरोबर व महेशबरोबर दुकानातील सर्व जबाबदारी ते आजही स्वत: आपल्या खांद्यावर घेऊन सक्षमपणे सांभाळत आहेत हे विशेष आहे. नरसिंह चिवटे (आप्पा) यांना ८५ व्या वाढदिवसाच्या हार्दिक.. हार्दिक.. शुभेच्छा !

**...राजेंद्र मेरगळ, करमाळा.**

## घोड्याच्या पुजेचा मान घेण्यावरून तिघांकडून दोघास बेदम मारहाण

करमाळा(सं.प्र.) : भैरवनाथाच्या घोड्याच्या पुजेचा मान तु आम्हांस का देत नाहीत, या कारणावरून तिघा जणांनी दोघा जणांना काठीने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जखमी केले आहे. हा प्रकार ११ एप्रिलला सकाळी दहा वाजता घारगाव येथे घडला आहे. या प्रकरणी विठ्ठल हनुमंत केसकर यांनी पोलीसात फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की गावातील भैरवनाथाचा घोडा पुजण्याचा मान आमच्याकडे आहे. आम्ही चौघा भावांनी १० एप्रिलला घोड्याची पुजा केली. त्यावेळी आमचे चुलते श्रीधर अंबाजी केसकर यांनी हा मान आम्हाला पाहिजे.. असे म्हणाले. त्यानंतर उद्या बैठक घेऊ असे ठरले. दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता बैठकीत चर्चा चालू असताना अंगद सरवदे, विठ्ठल सरवदे व श्रीधर केसकर यांनी बांबू व लाथाबुक्क्यांनी मला व माझा भाऊ रामदास यास बेदम मारहाण केली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## जेऊर येथे म.फुले यांची जयंती साजरी


करमाळा(सं.प्र.) : जेऊर येथे संभाजी ब्रिगेड संपर्क कार्यालयात महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी उमेश मोहिते म्हणाले, की समाजात शिक्षणाची ज्योत पेटवणारे, भेदाभेद, अस्पृशता, सती, बालविवाह सारख्या कर्मठ रूढी परंपरा व अंधश्रध्दांना विरोध करत कायम एकात्मतेचा, मानवतेचा विचार रूजविणारे तसेच शिवरायांची समाधी शोधून त्यांच्या जीवनावर पोवाडे रचून सर्वात प्रथम शिवजयंतीची सुरूवात करणारे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांचे जीवन चरित्र इतरांना प्रेरणादायी आहे. यावेळी संभाजी ब्रिगेडचे पुणे विभागीय अध्यक्ष नितीन खटके, निलेश पाटील, धन्यकुमार गारूडी, अतुल निर्मळ, सोमनाथ जाधव, आदिनाथ माने, सागर कोठावळे, अजित उपाध्ये, बहुसंख्य नागरीक उपस्थित होते.











# आईला पाहताच लेकरांनी घेतली झेप..!



करमाळा : "मायेविन बाळ क्षणभरी न राहे । न देखता होय कासावीस ॥ आणिक उदंड बुजविती तरी । छंद त्या अंतरी माऊलीचा ॥" संत तुकोबारायांनी बालकाच्या मनात आईची प्रतिमा काय असते, हे मांडले आहे. याची प्रचिती नुकतीच करमाळा न्यायालयात अनुभवास आली.

दीड आणि तीन वर्षाच्या लहान बालकांना बापाने आईच्या ताब्यातून हिसकावून नेले. आईने या मुलांसाठी नवऱ्याकडे खूप दया, याचना केली. परंतु बापाला ना बायकोची दया आली ना लेकराची दया आली. याबाबत तुकोबाराय म्हणतात.. "माऊलीची चाली लेकराचे ओढी । तया लागी काढी प्राणप्रिती ॥" याप्रमाणे आईने रडून लेकराची याचना केली. परंतु लेकरं मिळत नाही म्हटल्यावर तिने न्यायालयाचे दार ठोठावले व न्यायालयातून तिला न्याय मिळाला आणि तिची दोन्ही लेकरं १५ एप्रिलला तिच्या ताब्यात मिळाली.

यात हकीकत अशी की, उमरड (ता.करमाळा) येथील काळे परिवारातील अश्विनी हिला सांगवी फाटा, ता.शेवगाव, जि.अहिल्यानगर येथे दिले होते. तिचा संदीप पिंपळे याच्या बरोबर २०२० ला विवाह झाला. लग्नानंतर तिला त्रास सुरू होताच, तरीही ती तिथे नांदत होती. तिला रोहन (वय-३ वर्षे) व राज (दीड वर्षे) अशी दोन मुले झाली होती. मुलांच्या जन्मानंतर संसार सुखाचा होईल असे होते. पण झाले उलटेच पैशाच्या कारणावरून संदीपने अश्विनीला माहेरात सोडले आणि माहेरातूनच या दोन्ही लेकरांना जबरदस्तीने स्वत:च्या बरोबर सांगवी फाटा येथे नेले. त्यावेळी अश्विनीने खूप विनंती केली, नातेवाईकांनी विनंती केली. परंतु संदीपने या दोन्ही लेकरांना स्वत: बरोबर नेले. छोटं लेकरू अंगावर पीत असताना अश्विनीला लेकरावाचून झोप नव्हती. अखेर लेकरांसाठी ती करमाळा न्यायालयात आली.

करमाळा न्यायालयातील ॲड.सौ.अपर्णा पदमाळे यांना ती भेटली. त्यानंतर ॲड.पदमाळे यांनी न्यायालयात शोध अधिपत्र (वॉरंट) काढण्याचा अर्ज दिला. न्यायाधीश शर्वरी कुलकर्णी यांनी या मुलांचा शोध घेऊन न्यायालयात हजर करण्याबाबतचा आदेश दिला. त्यानुसार करमाळा पोलीस कार्यालयाचे पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी हवालदार डी.पी.ढेंबरे यांचेवर मुलाचा शोध घेण्याची जबाबदारी दिली. विशेष म्हणजे पोलीसांनी दखल घेऊन सुर्योदय होण्याच्या वेळीच संदीपचे घर गाठून संदीपला व या दोन मुलांना ताब्यात घेतले. त्यावेळी त्या वस्तीवरील लोकांनी बराच गोंधळ केला आणि त्या गोंधळात संदीप पोलीसांच्या तावडीतून पळून गेला. परंतु पोलीसांनी सतर्कता दाखवून या दोन्ही बालकांना १५ एप्रिलला सकाळी अकरा वाजता न्यायालात हजर केले. यावेळी पोलीसांच्या ताब्यातील या मुलांनी आई अश्विनी पिंपळे हिला पाहताच तिच्याकडे झेप घेतली. त्यावेळी अश्विनी पिंपळे तिच्या डोळ्यात आनंदाश्रु तरळले. न्यायालयात या मुलांचा ताबा अधिकृतपणे आईकडे देण्यात आला. यावेळी अश्विनी पिंपळे हिने वकील, पोलीस आणि न्यायालय या सर्वांचे आभार मानून लेकरांना घेऊन गेली.

> मी व माझे सहकारी शेवगाव पोलीस स्टेशनला पहाटे दोन वाजता गेलो. तेथून सकाळी सहा वाजता तेथील पोलीस घेऊन सांगवी फाट्यावर गेलो. बरोबर सकाळी सात वाजता या दोन्ही लेकरांना गाडीत बसवले. त्यावेळी त्या वस्तीवरील ३०-४० महिला गाडीला आडव्या झाल्या. परंतु त्यांच्याशी गप्पा मारतच गाडी काढली. त्यामुळे ही लेकरं सुखरूप आणता आली.
>
> .... डी.पी.ढेंबरे (हवालदार, करमाळा)

खुशखबर खुशखबर
मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको औरंगाबाद(२०८ किमी), नको मिरज (२३० किमी), आता आपल्या करमाळा (१/२ किमी) शहरात
डॉ.लोकरे हॉस्पिटल मध्ये सोमवार व गुरूवारी उपलब्ध
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)
उपलब्ध सुविधा...
● मुळव्याधवर इंजेक्शन ● डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब ● एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब ● संडासवाटे रक्त येणे, पु येणे ● संडासची जागा बाहेर पडणे ● संडास जागी खाज व आग होणे ● संडासाचा नागवेडा ● संडास नंतर बसण्यास त्रास होणे ● भगंदर, फिशर ● चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)
ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
लोकरे हॉस्पिटल
कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)
परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई
ओपीडीचे वैशिष्ट्ये...
● इंजेक्शन सुविधा ● लेझर सुविधा
● प्रभावी औषधी सुविधा ● मुळव्याधी आवश्यक ड्रेसिंग
● मेडिक्लेम सुविधा उपलब्ध ● पार्किंगची व्यवस्था
● आठवड्यातून दोनदा ओपीडी
नाव नोंदणीसाठी संपर्क मो.9763035862
विशेष सुचना... १. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल. २. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे. ३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील. ४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य. ५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.
बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

# सेवापूर्तीनंतर समाज घडविण्याचे कार्य शिक्षकांनी हाती घ्यावे : श्री.करे-पाटील



करमाळा(सं.प्र.):शिक्षक हा पिढ्या घडविणारा समाजातील प्रमुख घटक असून सेवेच्या काळात मुले घडविण्याचे कार्य शिक्षकांना करावे लागते. परंतु सेवापूर्ती झाल्यानंतर समाज घडविण्याचे कार्य सेवानिवृत्त शिक्षकांनी हाती घ्यावे; असे प्रतिपादन यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील यांनी केले. संगमेश्वर विद्यालय संगोबा येथील इंग्रजीचे शिक्षक विठ्ठल रोडगे यांच्या सेवापूर्ती कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक सुनील शिंदे हे होते. व्यासपीठावर प्रा.संजय चौधरी, देवा चव्हाण, रमाकांत अडसुळ, संपत कोठावळे, जयद्रथ झिंजाडे, त्रिंबक शेवाळे, प्रा.रघुनाथ रोडगे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी विद्यालयाच्या वतीने रोडगे यांचा सत्कार करण्यात आला. सुत्रसंचालन किरण भागडे यांनी केले. आभार देवानंद चव्हाण यांनी मानले.

विघ्नहर्ता इंटिरीयर
प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051
करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम
देवी प्लायवुड ॲन्ड हार्डवेअर
● प्लायवुड ● किचनट्रॉली ● वॉलपेपर
● हार्डवेअर ● फेव्हिकॉल ● वुडन फ्लोरिंग ● सनमायका
प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252
पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर

शुध्द.. स्वच्छ..स्वादिष्ट नी रुचकर..!
चिवटे उपहारगृह
साऊथ इंडियन: इडली सांबर, उडीदवडा सांबर, उत्तप्पा, डोसा
नाष्टा: पुरी भाजी, मिसळ पाव, पोहे/उपमा, दहीवडा/शिरा
स्नॅक्स: पावभाजी, तवापुलाव, सॅंडविच, फिंगर चिप्स
चाट: पाणीपुरी, स्पे.भेळ, रगडा पॅटिस, राज कचोरी
स्विट: पेढा, बर्फी, लाडू, जामून, मैसुरपाक, काजू कतली
नमकिन: फरसान, शेव, स्पे.चिवडा, पापडी
डेअरी: दही, दुध, खवा, पनीर, बासुंदी, लस्सी
कोल्ड्रींक: कोल्डकॉफी, ज्युस, मिल्कशेक, आईस्क्रीम
साऊथ इंडियन, नमकिन, नाष्टा, स्वीट, चाट, डेअरी, उपवास पदार्थ मिळतील.
एकवेळ अवश्य भेट द्या..!
राशिनपेठ, करमाळा. मो.८८८८१४७००५

लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स
होलसेल साडी डेपो व लेडीज, किड्स वेअर
प्रिंटेड साडी, कांजीवरम् साडी, काटपदर साडी, पार्टीवेअर साडी, कॉटन साडी, लेडीज टॉप व कुर्ती, लेगीज, किड्स वेअर तसेच रेडीमेड ब्लाऊजच्या भरपूर व्हरायटीज मिळतील
टीप : आहेराच्या साड्या व इतर साड्या होलसेल दरात मिळतील.
विशेष ऑफर : कॉटन परकर फक्त १०० रू. मध्ये मिळेल
पैठणी साड्यांचा भरपूर स्टॉक उपलब्ध
पत्ता : छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ, भवानीपेठ, करमाळा.(९१७२०९...)


श्री.राजाभाऊ देवकते
अभिनंदन व शुभेच्छा !
विहाळ येथील सुपुत्र मा.श्री.राजाभाऊ देवकते
यांनी पुणे(कात्रज) ते विहाळ असा १५५ कि.मी.प्रवास सायकलने एकाच दिवसात विक्रमी वेळेत पूर्ण केला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी विहाळ ते सोनारी व सोनारी ते विहाळ असा ११५ कि.मी. प्रवास श्री भैरवनाथाच्या ज्योतीबरोबर पूर्ण केला. दोन दिवसात २७० कि.मी. प्रवास सायकलवरून पूर्ण केल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन ! त्यांनी या उपक्रमातून युवकांना काही तरी नवीन वेगळी दिशा देण्याचे काम केले. त्यांच्या या उपक्रमास हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
किरण करे
दादा जाधव
संतोष मारकड
सुनील मारकड
प्रमोद देवकते
नानासो देवकते
दादासो गाडे
विहाळ, ता.करमाळा.


श्वेता गिफ्ट & टॉईज
सर्व प्रकारच्या
बॅटरी ऑपरेटेड
थार(जीप) व कार
उपलब्ध
लहान मुलांसाठी सर्व प्रकारची
खेळणी व भेटवस्तू उपलब्ध
पत्ता : श्रीराम मंदिर शेजारी, वेताळपेठ, करमाळा.
9822058106, 7798307085, 9096416076


उपमुख्यमंत्री
खासदार
मा.आमदार
उपमुख्यमंत्री, ओएसडी
जिल्हा प्रमुख
स्वातंत्र्यसैनिक वारसदार उद्यधिकारी संघटनेचे सचिव, महाराष्ट्र सीड्स पेस्टीसाईड फर्टीलायझर्स चे सचिव व ज्येष्ठ पत्रकार
श्री.नरसिंह(आप्पा) मनोहरपंत चिवटे
यांना दि.१९ एप्रिल रोजी असलेल्या ८५ व्या वाढदिवसास लाख.. लाख..
हार्दिक शुभेच्छा
माजी उपाध्यक्ष, जि.प.सोलापूर
श्री.राजेंद्र बारकुंड
शुभेच्छुक
राजेंद्र बारकुंड मित्र परिवार
करमाळा तालुका


प्रवेश...! प्रवेश ...!! प्रवेश...!!!
श्री योगीराज
प्रि-प्रायमरी स्कूल
नगर-बायपास रोड, जोगेश्वरी मिसळ शेजारी, करमाळा
इयत्ता Nursery, L.K.G., U.K.G.
वैशिष्ठ्ये :-
* भव्य व प्रशस्त वर्ग खोल्या
* अनुभवी व तज्ञ कृतीशील शिक्षक
* मर्यादित विद्यार्थी संख्या
* डिजीटल कृतीयुक्त शिक्षण
* संगणक कक्ष
* प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष
* सहशालेय उपक्रमांचे आयोजन
संपर्क
7387637146, 7588020377, 7387667535

# सुरज नव्हे..., डॉ.सुरज !

करमाळा(निळकंठ ताकमोगे) : जेवढा मोठा संघर्ष, तितकं तुमचं यश शानदार असतं. अशाचप्रकारे निंभोरे येथील सुरज मल्हारे यांचे यश शानदार आहे. अनंत अडचणीवर मात करत त्यांनी वैद्यकिय क्षेत्रातील एमबीबीएस ची पदवी मिळवली आहे. निंभोरे येथील दिवंगत डॉ.विकास मल्हारे व दिवंगत कविता मल्हारे यांचे चिरंजीव असलेले सुरज मल्हारे यांनी मिळवलेले यश खरंतर युवकांसाठी प्रेरणादायी आहे. अत्यंत प्रतिकुल आणि दु:खद प्रसंगात त्यांनी हे यश मिळवून आपले वडील स्व.विकास मल्हारे यांना वाहिलेली श्रध्दांजली आहे. त्यांच्या वडिलांची इच्छा होती की, माझा मुलगा डॉक्टर होऊन गोरगरीब रूग्णाची त्याने सेवा करावी आणि आज त्याने ते साध्य करून दाखवले.

करमाळा तालुक्यामध्ये दळण-वळणापासून लांब असलेले गाव, ज्या ठिकाणी आजही क्वचितच एसटी बघायला मिळते. अशा गावात परांडा तालुक्यातील चिंचपूर या गावाचे रहिवाशी असलेले डॉ.विकास मल्हारे यांनी १९९५ पासून ते २०२१ पर्यंत या निंभोरे गावामध्ये वैद्यकिय सेवा केली आणि या गावामध्ये सर्वसामान्यांना परवडेल; अशा खर्चात रूग्णांची सेवा केली. त्यामुळे निंभोरे, मलवडी, घोटी, लव्हे, गुळसडी, सरपडोह, वरकटणे, साडे आदी गावे त्यांचे कायमच ऋणी राहणार आहे. त्याचबरोबर त्यांच्या उपचारामुळे गुण येत असल्याने नगर, पुणे, मुंबई, कोल्हापूर आदी ठिकाणी त्यांचे पेशंट अशा दुर्मिळ दळणवळण सुविधा नसलेल्या गावी येऊन उपचार घेत होते. सर्व अत्यंत व्यवस्थित चालू असताना हे डॉक्टरांचे निर्माण होत असलेले वर्चस्व सहन झाल्याने काही विघ्नसंतोषी लोकांनी संबंधित डॉक्टर बोगस आहेत म्हणून त्यांचेवर खोटे-नाटे आरोप करून त्यांना त्रास देण्याचे काम केले. मात्र डॉ.मल्हारे या परिस्थितीला न घाबरत आपले काम करत राहिले. मात्र त्यांनी त्याचवेळी एक स्वप्नं बघितलं होतं आणि ते स्वप्नं म्हणजे माझी डिग्री बीएएमएस आहे आणि ती परराज्यातील आहे म्हणून बोगस डॉक्टर दाखवून जो काही लोकांनी त्रास दिला, त्या सर्वांना उत्तर म्हणजे माझा मुलगा साधीसुधी डिग्री न घेता एमबीबीएस एमडी,



एमएस सारखा बनवून दाखवील. तो पण कोठेही डोनेशन न देता त्याच्या हुशारीवर मी त्याला डॉक्टर बनवेल; असा पण त्यांनी केला होता आणि एक दिवस तरी याच गावात आणून दाखवील; असाही विश्वास त्यांनी व्यक्त केला. आज त्यांच्या मुलाने म्हणजे सुरजने आपल्या वडिलांचा विश्वास सार्थ ठरवला आहे. मात्र दुर्दैवाने मिळवलेले यश पाहाण्यास डॉक्टर व त्यांची पत्नी नाहीत. त्यांचे कोरोनाच्या काळामध्ये निधन झाले. याच आघातानंतर संपूर्ण कुटूंबावर अत्यंत विपरित परिणाम झाला आणि अशामध्येच या कुटूंबातील जवळपास पाच सदस्य त्या पूर्ण वर्षामध्ये निधन पावले. अशा परिस्थितीत सुरजने बारावी, नीट परीक्षा आणि एमबीबीएस सारखं शिक्षण पूर्ण करून सर्वांना दाखवून दिले.

शिक्षणासाठी आवश्यक असते एकाग्रता. एकाग्रतेसाठी लागते लक्ष आणि लक्ष केंद्रीत करण्यासाठी इंद्रियावर संयम ठेवून वाटचाल करावी लागते. तेच काम सुरज यांनी केले. आपल्या आई-वडिलांनी पाहिलेले स्वप्नं सुरजने पूर्णत्वास नेले. हे त्यांनी या निमित्ताने तालुक्यातील युवकांना दाखवून दिलं आहे.

खरंतर प्रत्येक आई-वडिलांची इच्छा असते की आपला मुलगा डॉक्टर व्हावा.., इंजिनियर व्हावा.., साहेब व्हावा.. मात्र हे सगळं बघायला ज्यावेळेस आई-वडील नसतात, त्यावेळेस मात्र काय भावना त्या मुलाच्या असू शकतात याची कल्पना करवत नाही. मात्र आज सूरजने तसे यश मिळवले आहे. खरंतर सुरज अत्यंत शांत, संयमी आहे. एमबीबीएस नंतरचे पुढील शिक्षण तो घेणार आहे आणि एक आदर्श आणि तज्ञ डॉक्टर म्हणून तो नावारूपास येणार यात काही शंका नाही..! सुरजच्या वाटचालीस खूप.. खूप.. शुभेच्छा !

***

डॉ.ओंकार विलास शिराळ (B.D.S.)
यांचा
अनुजा
दातांचा दवाखाना






वेळ : सकाळी १० ते रात्री ८ पर्यंत (सोमवार ते शनिवार)

उपलब्ध सुविधा...






- स्टेट ऑफ द आर्ट डेंटल चेअर
- पोर्टेबल एक्स-रे
- वेडेवाकडे/पुढे आलेल्या दातांचे ट्रीटमेंट
- लहान मुलांच्या दातांचे ट्रीटमेंट
- दातांच्या रंगाचे/पांढरे सिमेंट भरणे
- वेदनारहीत इंजेक्शन प्रणाली
- दात काढणे
- शस्त्रक्रिया करून अक्कलदाढ काढणे
- इंट्राओरल स्कॅनरद्वारे दातांचे माप घेणे
- दातांच्या आधारे पक्के दात बसवणे
- डेंटल इम्प्लांटच्या सहाय्याने दात बसवणे
- पूर्ण/आंशिक कवळी कमीत कमी अपॉइंटमेंटमध्ये बसवणे
- जबड्याच्या आजारांचे निदान
- रूट कॅनल ट्रीटमेंट
- अल्ट्रासोनिक मशीनद्वारे इन्फेक्टेड टिश्यू डिब्रायडमेंट करणे
- पुढील दातांमधील गॅप बंद करणे
- अल्ट्रासोनिक मशीनद्वारे दात स्वच्छ करणे
- दात पांढरे/शुभ्र करणे
- इंट्राओरल कॅमेराद्वारे तपासणी
- तंबाखू/गुटखा सवयी सोडवण्याबद्दल कौन्सलिंग
- मुख कर्करोग निदान

कृष्णाजीनगर, कमलादेवी रोड, LIC ऑफिस शेजारी, बायपास चौक, करमाळा.

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे
करमाळा तालुका वितरक
• बिल्डींग मटेरियल सप्लायर्स • प्लंबींग • हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ताः बायपास रोड, जेऊर.


८५ व्या वाढदिवसा निमित्त
कै.मनोहरपंत चिवटे
प्रथम नगराध्यक्ष, करमाळा नगरपरिषद
अभिष्टचिंतन सोहळा
श्री.नरसिंह(आप्पा)मनोहरपंत चिवटे
(पत्रकार)
सचिव, स्वातंत्र्यसैनिक वारसदार उत्तराधिकारी संघटना
सचिव, महाराष्ट्र सिड्स पेस्टीसाईड फर्टीलायझर्स
शनिवार, दि. १९ एप्रिल २०२५, सायं. ४ वाजता.
भव्य नागरी सत्कार
सायंकाळी ४.१५ वाजता.
सकाळी १० ते ५ वाजता.
• मोफत आरोग्य शिबीर • मोफत चष्मा वाटप • मोफत औषधे वाटप •
आयोजक : मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे चॅरिटेबल हॉस्पिटल
डॉ.ओंकार उघडे-पाटील
सायंकाळी ४ वाजता.
करमाळा शहरातील
जनतेसाठी
तुळशी वृंदावन
लोकार्पन सोहळा
स्थळ : श्री देवीचामाळ रोड, करमाळा
सकाळी ११ ते २ वाजता.
रत्न निधी ट्रस्ट, मुंबई
दिव्यांग व्यक्तिंना ज्यांना हात व पाय नाहीत त्यांना
मोफत मॉड्युलर हात व पाय
(जयपुर फुट)अवयव वाटप.
स्थळ : श्री देवीचामाळ रोड, करमाळा
सायंकाळी ७ ते १० वाजता.
राष्ट्रीय किर्तनकार
ह.भ.प.संग्राम बापू भंडारे
यांचे हरि किर्तन सोहळा
स्थळ - कन्या प्रशाला, श्री देवीचामाळ रोड, करमाळा